**<u>रे.मु.नं.13/2011 निशाणी कमांक 12 वर आदेश</u>**
**<u>(पारीत दिनांक 1 ऑक्टोबर 2012)</u>**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादीचे वतीने दिवाणी प्रक्रीया संहीता ऑर्डर 7 रुल 11 अन्वये दाखल केलेला असुन अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

02. दावा योग्य त्या मुदतीत दाखल केलेला नाही त्यामुळे मुदतीच्या कायद्याची त्यास बाधा आहे. तसेच मुंबई कोर्ट फी अधिनियमाप्रमाणे वादीने वादमिळकतीच्या किंमती इतका कोर्ट फी स्टॅम्प अदा केलेला नाही. दाव्यास मिस—जॉईंडर ऑफ पार्टीज ची बाधा आहे या वरील कारणाकरीता दावा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती अर्जात केलेली आहे. याउलट वादीचे वतीने म्हणणे दाखल करुन अर्जातील कथन पुर्णपणे नाकारलेले आहे. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकण्यात आले. प्रतिवादीच्या वतीने प्रतिपादन करण्यात आले की, दावा हा 1987 साली नोंदविल्या गेलेल्या दस्ताच्या आधारे दावा दिनांक 28/04/2011 रोजी दाखल केलेला असल्याने तो मुदतीत नाही. दस्तात वादमिळकतीची किंमत त्यावेळी रुपये तीस हजार मात्र होती परंतु, वादमिळकतीचे वर्तमान मुल्य मोठ्या प्रमाणात वाढलेले असुन त्यावर वादविषयाची किंमती वादीने आकारलेली नाही. तरी वादीचा दावा फेटाळण्यात यावा असे निवेदन केले गेले. याउलट वादीतर्फे निवेदन करण्यात आले की, वादीचा दावा हा गहाण मुक्तीसाठी असल्याने मुदतीच्या कायद्याच्या प्रमाणे वेळेत दाखल केलेला आहे. दाव्यास कोणतीही उणीव नसुन वादीने उपस्थित केलेले मुद्दे पटलावरील केस पहाता त्यांना कायद्याचा आधार नाही. सबब अर्ज फेटाळण्यात यावा असे निवेदन केले.

03. उभयपक्षांचे कथन व त्या अनुषंगाने करण्यात आलेले प्रतिपादन विचारात घेतले. वादपत्र मधुन कोणती वस्तुस्थिती वादमिळकतीच्या मुल्यांकनाबाबत दिसुन येते हे पडताळुन पाहण्यासाठी वादपत्र अवलोकनार्थ घेतले. वादपत्रात परिच्छेद कमांक 8 मध्ये स्पष्टपणे वाद मिळकतीचे मुल्यांकन नमुद केलेले दिसुन येत असुन दाव्यातील अंतिम रिलीफ विचारात घेता वादमिळकत गहाणमुक्त होवुन मिळणेसाठी दावा असल्याने त्याकरीता काल मर्यादेचा कायदा आर्टीकल 63 मधील घालुन दिलेली कालमर्यादा पहाता दावा मुदतीत दाखल झालेला दिसुन येत आहे. तसेच कोर्ट अधिकारासाठी वादमिळकतीची केलेले मुल्यांकन याची पडताळणी वादपत्रातील पक्षकथनावरुनच करता येत असल्याने दावा परिच्छेद कमांक 9 मधील नमुद केलेली दाव्याची वादविषयाची आकारणी व त्यावर न्यायालयीन शुल्कासाठी आकारण्यात आलेल्या न्यायालयीन शुल्क या बाबी विचारात घेवुन दावा ज्या दस्तावर आधारलेला आहे त्या दस्तातील दावा मिळकतीची असलेले मुल्यांकन विचारात घेवुन दावा हा गहाणमुक्तीसाठी आहे

हे पक्षकथनातुन स्पष्ट होते. प्रतिवादीच्या वतीने वादमिळकतीचे वर्तमान मुल्य दर्शविण्याकरीता दुय्यम निबंधक तळोदा यांचा मुल्यांकन दाखला दाखल केलेला असुन त्यात रुपये अकरा लाख पेक्षा जास्त वर्तमान किंमत वादमिळकतीची दर्शविलेली असली तरी दाव्यात ज्या दस्तास आव्हान दिले गेलेले आहे त्या दस्तातील मुल्यांकन विचारात घेता दावा विषयाच्या आकारणीमध्ये कोणतीही उणीव दिसुन येत नाही. तसेच दाव्यात नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीजचा व लिमिटेशनचा मुद्‌दा उपस्थित केलेला असला तरी सदरचे मुद्‌दे हे कायदा व वस्तुस्थितीचे संमिश्र प्रश्न असल्याने अंतिम न्यायनिर्णयाचे वेळी विचारात घेतले जाणार असुन ती बाब पटलावर योग्य तो पुरावा आल्यानंतर स्पष्ट होणारी आहे. वर नमुद एकुण बाबींचा विचार करता वादविषय व दाव्यातील मुळ मागण्या पहाता प्रतिवादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे सबब अर्ज फेटाळण्यात येतो.

दिनांक :— 01/10/2012

( **र.म.कराडे** )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,तळोदा
ता. तळोदा, जि. नंदुरबार